RIGHT TO INFORMATION
सूचना का अधिकार

सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**

**स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय, महाराष्ट्र राज्य**

**कोंकण भवन, सहावा मजला, नवी मुंबई ४०० ६१४**

☎/ 🖷:- २२,२७५७१३९१ Website:www. mahalfa.in E.Mail:ad.computer @mahalfa.in


जा.क्र.स्था. १८/ब/ अहवाल निर्गमन/क.ले.प./संगणक शाखा/न.क्र. १०७/२५४२ दिनांक :- 14 NOV 2017

प्रत,

1) सहसंचालक,
स्थानिक निधी लेखा परीक्षा ( सर्व ).

2) सहाय्यक संचालक,
स्थानिक निधी लेखा परीक्षा ( सर्व ).

विषय : जिल्हा परिषद (४ विभाग) व 'अ' वर्ग नगरपालिका/ नगरपालिका शिक्षण मंडळांच्या अहवाल निर्गमनाबाबत.

संदर्भ : १. संचालनायाचे स्थायी आदेश क्रमांक १४/२०१७, दि. १२.०९.२०१७.
२. संचालनायाचे स्थायी आदेश क्रमांक ०४/२०१७, दि. ०३.०२.२०१७.

उपरोक्त संदर्भ क्रमांक १ अन्वये जिल्हा परिषद/ पंचायत समिती/ नगरपालिका/ नगरपालिका शिक्षण मंडळ/ नगरपंचायत यांच्या लेखापरीक्षण कामकाजाविषयी कार्यपध्दती व कार्यकक्षा याबाबत या संचालनालयाकडून सुचना निर्गमीत करण्यात आल्या आहेत.

जिल्हा परिषद (४ विभाग) व 'अ' वर्ग नगरपालिका/ नगरपालिका शिक्षण मंडळ यांचे अहवाल जिल्हा स्तरीय सहाय्यक संचालक स्तरावरुन MAINS System वर निर्गमीत करण्यास तांत्रिक अडचणी येत असल्याचे निदर्शनास येत आहे. तद्नुसार खालील सुचना देण्यात आहेत.

सदरचे अहवाल सह संचालक स्तरावरच प्रकाशित करण्यात यावेत. सदर अहवाल प्रकाशित करताना Attachment स्वरुपात जोडण्यात येणारे First Page with memo reading sign, Part 1, Last Page with Office head's sign तीनही Word Format मध्ये आणि Annexure PDF Format मध्ये ख़ाली विहीत केलेल्या पध्दतीने तयार करण्यात यावेत.